# ''संगीत नाट्यकलेचे आश्रयदाते: राजर्षी शाहू महाराज''

**डॉ. मनीषा आझाद नायकवडी** मराठी विभाग, न्यू कॉलेज, कोल्हापूर मो.९६८९८३७०८५

**सारांश:**

शाहू महाराजांनी केवळ लोककल्याणकारी राज्यकारभार केला असे नव्हे तर आपल्या कारकिर्दीमध्ये अनेक कला, विद्या यांना राजाश्रय दिला. आपल्या प्रजेचे जीवन सर्वांगाने आणि सर्वार्थाने परिपूर्ण व्हावे या उददेशाने राजर्षीनी अनेक सुधारणा आपल्या संस्थानात केल्या. शिक्षण, खेळ, विविध कलांच्या वृद्धीसाठी कर्णाप्रमाणे या लोकराजाने द्रव्यनिधीचा मुक्तहस्ते वापर केला. गायक, संगीतकार, चित्रकार, शिल्पकार, नाट्य कलाकारांना शाहू महाराजांनी मोठे केले. महाराष्ट्रातील सर्वच प्रकारच्या कलाक्षेत्रांची गंगोत्री कोल्हापूरातून उगम पावली. कोल्हापूर म्हणजे कलापूर! त्याचे प्रेरणास्थान, आधारस्तंभ, पोशिंदे राजर्षी छत्रपती शाहू महाराज होते. आबालाल रहिमान, बाबुराव पेंटर, आनंदराव पेंटर यांसारखे दिग्गज चित्रकार या पुण्यभूमीचे! भालजी पेंढारकर, बाबुराव पेंढारकर, मा. विनायक, व्ही. शांताराम यांसारखे सिनेसृष्टीचे प्रणेते याच कलाभूमीच्या मुशीतून घडले. डॉ. बाळकृष्ण यांच्यासारखे इतिहासकार, माधव ज्युलियन यांच्यासारखे कविराज, ना. सी. फडके, वि. स. खांडेकरांसारखे श्रेष्ठ साहित्यिक करवीर नगरीत वावरले. साहित्य, संगीत, नृत्य, गायन, चित्रकला, नाट्यकला, शिल्पकला इ. अनेक कलांना पंचगंगा तिरावरील करवीर नगरीतच बहर आला आणि या संगमतीर्थाचे अध्वर्यू होते राजर्षी शाहू महाराज! कोल्हापूर सिनेटोन, शालिनी सिनेटोन, सरस्वती सिनेटोन, हंस पिक्चर्स, प्रभात पिक्चर्स इ. ऐतिहासिक सिनेसंस्थांच्या रंगरेखा इथूनच तेजोमय झाल्या. शाहू महाराज स्वत: पट्टीचे मल्ल होते. १८९४ साली गादीवर आल्यावर कोल्हापूरात मल्लविद्येचे पुरुज्जीवन झाले. कोल्हापूरचा कुस्ती फड आजही देशात आघाडीवर आहे.

**महत्वपूर्ण संज्ञा**– राजर्षी, ललित कला, संगीत, दरबार, गवई, धर्मपीठ इ.

'सम सर्वेषु भूतेषु तिष्ठन्त परमेश्वरम्! (गीता अध्याय १३) या उक्तीला अनुसरून राजर्षी शाहू महाराजांनी राज्यकारभार केला. निष्काम कर्मयोगाचे अचूक तत्वज्ञान संपूर्णत: आत्मसात करून ज्यांनी आचरिले ते राजर्षी शाहू महाराज इतिहासात श्रेष्ठ कर्मयोगी ठरले. कर्मठ धर्ममार्तंडांच्या जुलमी वर्तनाला प्रत्यक्ष सामना देण्यासाठी राजर्षीनी करवीर क्षेत्री क्षात्रजगत्गुरुंचे स्वतंत्र धर्मपीठ स्थापन केले. राजर्षी शाहू महाराज कलोपासक होते, दीन–दलित–पीडितांचे कैवारी होते. उद्धारक होते, समाजवादाचे प्रेषित होते.

**संगीत कला:**

ललित कलांमध्ये मुख्यत्त्वे संगीत, नाट्य व चित्रकला यांचा समावेश होतो. शाहू महाराजांनी या कलांना राजाश्रय देऊन महाराष्ट्रात त्यांचे सुवर्णयुग निर्माण केले. शाहुपूर्वकाळापासून कोल्हापुरात संगीताची परंपरा चालत आली होती. दरबारी नवरात्रोत्सवात, पंत अमात्यांच्या रामनवमी उत्सवात लोकसंगीत व शास्त्रीय संगीताचे कार्यक्रम आयोजिले जात. करवीरच्या श्रोत्यांसमवेत दस्तूरखुद्द शाहू महाराज अशा मैफिलींचा मन:पूर्वक आस्वाद घेत, कलाकारांचा आदरसत्कार करत, संपूर्ण कोल्हापूर संगीतमय होई. खुद्द महाराजांचे जनक पिता आबासाहेब घाटगे हे संगीतकलेचे निस्सीम भोक्ते होते. संगीताची आवड हा वारसा महाराजांना वडिलांकडून मिळाला. सन १८८३ साली कोल्हापूरात 'करवीर गायन समाज' (सध्याचे देवल क्लब) या संस्थेची स्थापना झाली. या संस्थेला सुरुवातीपासूनच शाहू महाराजांचा आश्रय मिळाला. त्यांच्याच प्रेरणेने संस्थेस अखिल भारतीय कीर्ती प्राप्त झाली. महाराजांच्या या कामगिरीचा गुणगौरव करताना प्रसिद्ध संगिततज्ज्ञ एस. ए. कुलकर्णी यांनी म्हटले आहे, ''आज देशात विविध संगीत घराण्यांचे गायक–गायिका कीर्तिमान झालेल्या आहेत. त्यांची वंशावळ करवीर नगरीतच संवर्धिली गेली आहे आणि त्याचे मूळ प्रणेते होते राजर्षी शाहू महाराज! पुढे जेव्हा कोल्हापुरात महाराजांच्या कृपाप्रसादाने बहरलेला 'देवल क्लब' प्रसिद्धीस आला तेव्हा देशातल्या प्रत्येक गायक–गायिकेला वाटायचे आपले गायन देवल क्लबमध्ये व्हावे. 'देवल क्लब'मध्ये जो जो कलाकार आपली गायन–वादनाची कला सादर करू शकला तो देशाच्या कीर्तिवलयात तरंगू लागला!''

कोल्हापूर दरबारात गायनाच्या अनेक मैफिली होत. अनेक गायक आपली हजेरी लावून जात. महाराज त्यांना मानधन, बक्षिसेही देत, त्यांचा आदरसत्कार करीत. बॅरिस्टर जयकरांसारख्या श्रेष्ठ समीक्षकाने ज्यांचे वर्णन 'संगीतातील माऊंट एव्हरेस्ट'अशा शब्दांत केले ते अल्लादिया खाँसाहेब प्रथम बडोद्याला होते. तेथे मौलाबक्ष नावाच्या गवयाबरोबर त्यांचे पटत नसल्यामुळे खाँसाहेब मुंबईला निघून आले. मुंबईला खाँसाहेबाच्या गाण्याच्या तीन मैफिली झाल्या. श्रीमंत बापूसाहेब कागलकरांनी या मैफिली ऐकून ते प्रभावित झाले. त्यांनी शाहू महाराजांना खाँसाहेबांची संपूर्ण माहिती दिली. महाराजांनी खाँसाहेबांना आग्रहपूर्वक निमंत्रण देऊन कोल्हापूरला बोलावून घेतले. राज्यात आल्यावर दुसऱ्याच वर्षी शाहू महाराजांनी त्यांची 'दरबार गवई' म्हणून अडीचशे रुपये वेतनावर नेमणूक केली, त्यांना इनाम जमीन दिली. खरी भागात (सध्याचे खरी कॉर्नर) निवासासाठी प्रशस्त घर बक्षीस दिले. मैफिलीसाठी खाँसाहेबांना हिंदुस्थानात कुठेही

जाण्याची परवानगी दिली. खाँसाहेब नियमितपणे महालक्ष्मी मंदिरात आणि दरबारात गात असत, त्यांनी 'जयपूर अत्रौली घराण्याच्या गायकीचे दर्शन कोल्हापूरच्या व महाराष्ट्राच्या रसिकांना घडविले.

१२ डिसेंबर १९१२ रोजी पंचम जॉर्ज बादशहाच्या राज्यारोहणाप्रीत्यर्थ दिल्ली दरबार भरला होता. या समारंभास आपल्या कुटुंबासमवेत महाराजांनी खाँसाहेबांना नेले, मित्राच्या नात्याने वागविले. त्यांच्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या आड ते कधीही आले नाहीत. दिल्ली दरबारचा सोहळा आटोपून खाँसाहेब मुंबईत आल्यानंतर बाळासाहेब गायकवाडांच्या विनंतीवरून खाँसाहेबांनी बाळाबाई उर्फ बाकाबाईसोबत केसरबाईंना गाणे शिकविण्याची विनंती केली. तीन महिने या दोघींना खाँसाहेबांनी विनामूल्य गाणे शिकविले. भारतीय संगीत क्षेत्रात अल्लादिया खाँसाहेबांची उंची हिमालयातील 'गौरीशंकर' शिखराप्रमाणे होती. खाँसाहेबांबरोबर त्यांचे बंधू हैदर खाँ आणि तीन पुत्र मंजीखाँ, भुर्जीखाँ आणि नसिरुद्दीन खाँ असे सर्व गवई कुटुंब वास्तव्यास आल्याने कोल्हापूर नगरीत जणू संगीताच्या विद्यापीठाचीच स्थापना झाली. यातूनच पं. भास्करबुवा बखले, हैदरखाँ, मंजीखाँ, नथ्थनखाँ, केसरबाई केरकर, मोगुबाई कुर्डीकर, जसदनवाला, जरीवाला, गोविंदबुवा शाळीग्राम, निवृत्तीबुवा सरनाईक इ. प्रभृती अल्लादियाखाँचे अखिल भारतीय कीर्तिचे शिष्य उदयास आले आणि त्यांनी भारतीय संगीत समृद्ध केले. केसरबाईंचा गौरव गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांनी त्यांच्या विश्वभारतीतर्फे 'सूरश्री' हा किताब देऊन केला. शाहू महाराजांनी शास्त्रीय संगीताच्या उत्कर्षासाठी बजावलेली कामगिरी, कलाकारांना वेळोवेळी केलेली मदत व दिलेले उतेजन उल्लेखनीय आणि गौरवास्पद आहे. शाहू महाराजांनी कलाशारदेच्या मस्तकावर रत्नांचा मुकुट चढविला. अंजनीबाई मालपेकर या थोर गायिकेला महाराजांनी असाच राजाश्रय दिला. हिंदविख्यात गायिका अंजनीबाई मालपेकर यांचे सरकार दरबारी वजन होते. राजेरजवाड्यात त्या गेल्यानंतर सर्व दरबार उठून उभे राहून त्यांना मानवंदना देत.

१९०५ साली अंजनीबाई मालपेकर यांच्या गाण्याचा कार्यक्रम छत्रपती शाहू महाराजांनी राजवाड्यात घडवून आणला होता. त्यावेळी माईंच्या दैवी तेजाने व गाननैपुण्याने महाराज अक्षरशः मंत्रमुग्ध झाले होते. त्यावेळी त्यांनी नारळाच्या कवटीपासून बनवलेला तंबोरा, हिरमणी पोपट आणि कमा नि गोविंदा ही कुत्र्यांची जोडी अशा अपूर्व भेटी माईंना दिल्या, माईंच्या गाण्याचे महाराज चाहते बनले. एके दिवशी कोल्हापूरचे सरदार बाळासाहेब गायकवाड वाघाचे बछडे घेऊन ऑपेरा हाऊसजवळील माईंच्या नारायणाश्रमात अवचित आले. अंजनीबाईंना साहजिकच आश्चर्य वाटले. त्यांनी विचारले, 'अहो बाळासाहेब, हे काय? वाघाची पिल्ले?' होय माई, महाराजांनी आपल्याला ही खास भेट पाठविली आहे. हे शब्द ऐकून माईंना आश्चर्य आणि आनंद वाटला. महाराजांच्या शिकारखान्यातील एक वाघीण नुकतीच व्याली होती, तिची ही पिले होती. माईंकडे पापी दृष्टीने पाहणाया दोन–तीन संस्थानिकांकडे व गोव्याच्या पोर्तुगीज गव्हर्नरकडे माईंच्या गाण्याच्या मैफिली झाल्या होत्या. त्यावेळी माईंच्यावर दुर्धर प्रसंग ओढवले होते. त्या प्रसंगांतून माईंनी ज्या शिताफीने आणि धैर्याने स्वतःची मुक्तता करुन घेतली त्याबद्दल महाराजांनी माईंच्या धैर्याचे कौतुक तर केलेच परंतु त्यांच्या या बहादुरीबद्दल वाघाचे दोन बछडे भेट म्हणून दिले. महाराजांच्या या भेटीमागचा उदात्त हेतू पाहून माईंना अत्यानंद झाला, या भेटीचा त्यांनी मोठ्या आदराने स्वीकार केला.

हैदरखाँनी लक्ष्मीबाई जाधव यांना संगीताचे शिक्षण दिले. त्या हिंदुस्थानात 'गानचंद्रिका' म्हणून प्रसिद्धीस आल्या. बडोदा संस्थानच्या दरबार गायिका झाल्या. भुर्जीखाँनी मेनका शिरोडकर, अझमबाई, सरदारबाई कारदगेकर, धोंडूबाई, वामनराव सडोलीकर, सी. बालाजी, गजाननराव जोशी, नूतनगंधर्व आप्पासाहेब देशपांडे इ. ना संगीताचे शिक्षण दिले. अशा पद्धतीने जयपूर अत्रौली घराण्याच्या गायकीचा वटवृक्ष करवीर नगरीत बहरला, त्याचे संवर्धन शाहू महाराजांनीच केले. कलाप्रेमी शाहू महाराज कोल्हापूरला सलग चार–पाच दिवस देशातील महान गायकांना अगत्यपूर्वक आमंत्रित करुन त्यांच्या गायनाच्या मैफिली आयोजित करीत. यामध्ये अल्लादियाखाँचा पुढाकार असे. दिल्लीचे नथ्थनखाँ, मिरजेचे अब्दुल करीमखाँ यांसारख्या अनेक नामांकित गायकांच्या मैफिली होत. त्यामुळे करवीरकरांना संगीताची अखंड मेजवानी लाभत असे. या सर्वांचे सूत्रधार होते राजर्षी छत्रपती शाहू महाराज!

उस्ताद रज्जबअलीखाँ यांचे काही वर्षे कोल्हापूरला वास्तव्य होते. शाहू महाराजांनी त्यांना खूप सन्मानाने वागविले. त्यांनी निवृत्तीबुवा सरनाईक व नूतनगंधर्व आप्पासाहेब देशपांडे यांना शिकविले. सर्कसवाले छत्रे यांनी रहिमतखाँसाहेब अवलिये यांना सांभाळले होते. एकदा सर्कशीचा मुक्काम कोल्हापूरला होता. रहिमतखाँ व अल्लादियाखाँ यांची संयुक्त मैफिल ठरली. परंतु अल्लादिया खाँसाहेब औषधोपचारासाठी सांगलीला सांभारे वैद्यांकडे गेले होते. तेव्हा छत्रे महाराजांना खवचटपणे म्हणाले, 'हमारा शेर आया और तुम्हारा शेर निकल गया।' महाराजांना हे वाक्य सहन झाले नाही, त्यांनी अल्लादियाखाँ साहेबांना तात्काळ बोलावून घेतले आणि ठरल्याप्रमाणे या दोन अद्वितीय 'शेरां'च्या संयुक्त मैफिलीही झाल्या. महाराजांचे कला उपासकाला नेहमीच भरीव पाठबळ असे. बापूराव शाळीग्राम यांनी मृदंग वादनाचे शिक्षण घेतले होते. शाहू महाराजांचे या कुटुंबावर विलक्षण प्रेम होते. बापूरावांचे वडील संस्थानी नोकरीतून निवृत्त झाल्यावर महाराजांनी बापूरावांची त्यांच्या वडिलांच्या ठिकाणी नेमणूक केली. बापूरावांना कुदोसिंग घराण्याचे पानसे यांच्याकडून मृदंग वादनाचे पुढील शिक्षण घ्यावयाचे होते. एकदा पानसे यांचे शिष्य अनंत

साधले यांचे मृदंग वादन राजवाड्यावर झाले. बापूरावांनी महाराजांना सांगितले, 'महाराज, ही मृदंगवादनाची कुदोसिंग घराण्याची परंपरा आहे. यांच्याकडे मला शिकायला मिळाले तर माझं जीवन सफल होईल.' तेव्हा महाराजांनी खुद्द अनंत साधले यांना दरबारी नोकरीत सामील करून घेतले. ते बापूरावांना म्हणाले, 'बापू, शिक आता तुला किती शिकायचे ते' आणि बापूरावांना मृदंगवादनातील प्रागतिक शिक्षण लाभले.

शाहू महाराजांच्या लेखी उच्च–नीच कलाकार असा कोणताही भेदाभेद नव्हता. मग तो पट्टीचा शास्त्रीय गायक असो, ठुमरी गायक असो किंवा भजनी गायक असो! महाराजांचे सक्रिय प्रोत्साहन सर्वांनाच असायचे. त्यामुळे कृष्णा कोल्हापूरकरीण (ठुमरी लावणी गायिका), झोराबाई (ठुमरी गायिका), पीरबाई (ख्याल–ठुमरी गायिका), सरफूबाई (ख्याल गायिका), बया गणेशवाडीकर (ख्याल–गायिका), बनू कोल्हापूरकरीण (गायिका व नर्तिका), दानशूर आवडाबाई (ख्याल गायिका) अशा कितीतरी गायिकांना करवीर नगरीत कलेचे संवर्धन करायला मिळाले आणि त्यांच्या कलेचे सोने झाले. भजनी गायक पंडितराव करंबेळकर हे मूळचे आळते गावचे होते. ते दत्तकपुत्र या नात्याने आजोळी–करवीर नगरी रहायचे. बालपणापासूनच त्यांना गायनाची आवड होती. शालेय समारंभात त्यांनी धिटाईने एक नाट्यगीत गायिले. त्या समारंभाला शाहू महाराज उपस्थित होते. महाराजांनी पंडितरावांना दरमहा १५ रुपयांची शिष्यवृत्ती मंजूर केली. पंडितरावांनी भजनी गायक तुकारामबुवा सरनाईक यांच्याकडून भजनी गायकीचे शिक्षण घेतले आणि पुढे पट्टीचे 'भजनी गायक' म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात नावलौकिक मिळविला. असाच एक भजनी गायक म्हणजे कृष्णा बागणीकर. घरच्या अत्यंत बिकट परिस्थितीमुळे नोकरीच्या शोधार्थ तो वणवण भटकत होता. शाहू महाराजांनी कोल्हापूरच्या एका प्रसिद्ध पेढीवर त्याला नोकरी मिळवून दिली. नोकरी सांभाळत गायनाचे थोडे–बहुत शिक्षण घेत बागणीकर पुढे एक उत्तम भजनी गायक म्हणून नावारूपाला आले. त्यांच्या भजनाचे आगळेवेगळे वैशिष्ट्ये म्हणजे ते अभंग–गौळणी नाट्यगीतांच्या चालीवर हुबेहूब आळवीत असत. त्यांच्या भजनामध्ये धुमाळी, भजनी ठेका, केरवा या तालापेक्षा दादरा, एकताल, झंपा, रूपक, दीपचंदी, अध्धा त्रिताल असे गायकीचे ताल असत. त्यामुळे वारकरी संप्रदायापेक्षा त्यांचे भजन नाट्यसंगीताप्रमाणे कर्णमधूर वाटे.

शाहू महाराजांनी 'तमाशा' या कलेलाही सक्षम प्रोत्साहन दिले. ख्यातनाम तमासगीर सावळजचा तात्या याच्या 'मोहना–बटाव' या वगाने प्रसिद्धीचा कळस गाठला होता. महाराजांना तात्याबद्दल माहिती मिळाली होती. कागलच्या गैबी पीराच्या उरसामध्ये तात्याचा तमाशा आहे हे समजल्यावर महाराज कागलला तमाशा पाहण्यासाठी रवाना झाले. 'मोहना–बटाव' चा वग महाराजांनी आतुरतेने ऐकला. त्यांनी तात्यांना जरीपटक्याचा आहेर आणि त्याकाळी एक हजार रुपयांची थैली देऊन 'शाही' सत्कार केला. राजर्षी शाहू महाराजांची दानशूर वृत्ती पाहून संत तुकाराम महाराजांच्या वचनाची आठवण होते.

''जे का रंजले गांजले। त्यासि म्हणे जो आपुले !
तोचि साधू ओळखावा ! देव तेथेचि जाणावा!''

**नाट्यकला:**

शाहू महाराजांनी संगीत कलेबरोबर नाट्यकलेलाही राजाश्रय दिला. गायन कलेप्रमाणे रंगभूमीलाही मोठे पाठबळ दिले. नाटके पाहण्याची महाराजांना विलक्षण आवड होती. राजर्षी शाहू महाराज हे छत्रपती शिवाजीराजे भोसले यांच्या वंशातील! याच वंशात तंजावारचे भोसले राजे होऊन गेले. त्यांनी मराठीतील पहिले नाटक दरबारात करवून घेतले. मराठी नाटकाचा जन्म १६९० साली तंजावर भोसले घराण्यात झाला. पुढे १८३२ पर्यंत तंजावर येथे नाटके होत होती.

राजर्षी शाहूंचा जन्म १८७४ साली झाला. त्याकाळीही कोल्हापुरमध्ये नाट्यसंगीताचे कार्यक्रम होत. रामनवमी, नवरात्रोत्सव अशा कार्यक्रमांमधून गाणे, कीर्तन यामध्ये लोक सहभागी व्हायचे. जयसिंगराव आबासाहेबांना नाट्यसंगीताची असलेली आवड महाराजांमध्येही वृद्धिंगत झाली. १७ मार्च १८८४ रोजी राजर्षी शाहूंचा दत्तकविधान समारंभ पर पडला. यावेळी राजाराम कॉलेजच्या मधल्या दालनात कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी 'रोमिओ–ज्युलिएट' यांचे भाषांतरित 'शशिकला–रत्नपाल' हे नाटक करून दाखविले. शाहू महाराज प्रवेश करताच सर्व प्रेक्षकांनी उठून खडी ताजीम दिली. महाराजांना हे नाटक खूप आवडले. गॅलरीमध्ये बसलेल्या राजघराण्यातील स्त्रिया आणि इतर सरदारांच्या स्त्रियांनाही हे नाटक आवडले. याच वेळी दत्तक प्रसंगानिमित्त २० मार्च १८८४ रोजी कोल्हापूर गायन समाजामार्फत नानासाहेब कागलकर यांच्या वाड्यात केशवबुवा गोगटे, विष्णुपंत छत्रे व बळवंतराव पोरे यांचे गायन झाले. ही मैफिल ऐकण्यासाठी बडोद्याहून पाहुणेमंडळी आली होती. बैठक संपल्यावर महाराजांनी बडोद्याच्या पाहुण्यांचा सत्कार केला व कलावंतांचाही सत्कार करून त्यांना बिदागी दिली. दिवसेंदिवस शाहू महाराजांची नाटकाची गोडी वाढू लागली. हे लक्षात घेऊन राजाराम कॉलेजनेही त्यावेळी बुकीश नाटके करण्याची प्रथा सुरु केली. जुन्या राजवाड्यातील भवानी मंडपाच्या आतील चौकात त्यावेळी कॉलेजची नाटके होत. शाहू महाराजांच्या प्रेरणेतून राजारामियन्स बरेच खेळ करीत. महाराजांना नाट्यकलेची आवड आहे असे समजताच अनेक नाटक मंडळ्या, कलाकार कोल्हापूरात येऊ लागले.

१८८६ साली 'किर्लोस्कर नाटकमंडळी' कोल्हापूरात आली. त्यांचा 'संगीत सौभद्र' चा प्रयोग झाला. महाराजांच्या राज्याभिषेक प्रसंगी 'शाहूनगरवासी', 'स्वदेशहितचिंतक', अशा अनेक नाटक मंडळ्या कोल्हापूरात आल्या होत्या. या सर्वांची शाही व्यवस्था महाराजांनी केली. गणपतराव जोशी यांनी केलेली हॅम्लेटची भूमिका महाराजांना अतिशय भावली. कोल्हापूरात गाजलेले नट केशवराव भोसले हे वयाच्या चौथ्या वर्षापासून नाटकामध्ये काम करीत होते. शाहू महाराज केशवरावांची खूप काळजी घेत. १९०८ साली भार्गवराव वरेरकरांचे 'कुंजविहारी' हे नाटक पुस्तकरूपाने आले. हे नाटक मामा वरेरकरांनी शाहू महाराजांना त्यांची परवानगी घेऊन अर्पण केले.

ती **अर्पणपत्रिका :–**

**अर्पणपत्रिका – कुंजविहारी**

**नाविष्णु : पृथिवीपतिः**

ही अल्प कृती श्रीमन्महाराज शाहू छत्रपती सरकार, करवीर, एल.एल.डी.,डी.डी.जी.सी.एस.आय. यांस त्यांच्या साहित्यप्रियता, गुणग्राहकता, उदात्तता इ. अनेक गुणांवर लुब्ध होऊन श्रीविष्णूस्वरूप कल्पून त्यांच्याच परवानगीने अत्यंत आदरपूःसर अर्पण.

**आज्ञांकित**

**भार्गवराव विठ्ठल वरेरकर**

बालगंधर्वासारख्या नटास महाराजांनी सहाय्य करून मराठी रंगभूमीला भरीव योगदान दिले. बालगंधर्व लहान असताना त्यांचे गाणे महाराजांनी ऐकले आणि त्यांच्या सुमुधुर गाण्याचे कौतुक केले. पुढे महाराजांना समजले की, हा मुलगा बहिरा आहे. त्याला त्यांनी बोलावून घेतले आणि मिरजेला डॉ. व्होल यांच्याकडे पाठविले. तेथे त्याच्या कानावर उपचार करण्यास सांगितले. त्यांच्याकडून गायनाची तयारी करवून घेतली. किर्लोस्कर नाट्यमंडळीत त्याला पाठवून दिले. पुढे याच बालगंधर्व उर्फ नारायण राजहंस यांनी रंगभूमीवरील 'नटसम्राट' पद भूषविले. याकामी राजर्षी शाहू महाराजांचे योगदान कदापि विसरता येणार नाही.

रंगभूमी गाजविणारे अण्णासाहेब किर्लोस्कर, दत्तोपंत हल्ल्याळकर, भाऊराव कोल्हटकर, गणपतराव जोशी, केशवराव भोसले, सिनेसृष्टी गाजविणारे बाबुराव पेंटर, चित्रकलातपस्वी आबालाल रहिमान, गायिका सकवारबाई, साहेबजान, सोपीजान ह्या भगिनी, रंगभूमीचे नेपथ्यकार आनंदराव पेंटर, तबलजी दादा लाडू, बळवंतराव रुकडीकर, गणपत गुरव, पखवाजपटू सादले बुवा, नाटककार आणि पेटीवादक गोविंदराव टेंबे, शाहीर लहरी हैदर इ. अनेक कलाकार कोल्हापूरात लौकिकास आले आणि भारतभूमीच्या कलावैभवास ललामभूत झाले.

१९०२ साली शाहू महाराज ज्यावेळी विलायतेला गेले त्यावेळी रोम येथील कुस्ती मैदाने व नाट्यगृहे पाहून प्रभावित झाले. आपणही कोल्हापूरात अशी योजना आखावी असा मनसुबा महाराजांनी रचला. त्या योजनेचेच मूर्त स्वरूप म्हणजे आजचे खासबाग मैदान आणि पॅलेस थिएटर होय. याच पॅलेस थिएटरला स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्र सरकारने 'केशवराव भोसले नाट्यगृह' असे नाव देऊन थोर नटाचे स्मरण जागते ठेवले. या नाट्यगृहाचा प्लॅन कागलचे ओव्हरसियर जिवबा कृष्णाजी चव्हाण यांच्याकडून महाराजांनी करवून घेतला. १९१३ साली या नाट्यगृहाचे बांधकाम सुरु झाले व १९१५ साली म्हणजे अवघ्या दोन वर्षात हे थिएटर पूर्ण झाले. या नाट्यगृहाचे उद्घाटन युवराज छत्रपती राजाराम महाराज यांच्या हस्ते १९१५ साली दसऱ्याच्या मुहूर्तावर किर्लोस्कर कंपनीच्या 'मानापमान' या नाटकाने झाले. उद्घाटन प्रसंगी शाहू महाराजांनी कामगार, कंत्राटदार व कामात सहभागी सर्व मंडळींचा सत्कार केला. बालगंधर्व, केशवराव भोसले, बाळासाहेब पंडीत, गणपतराव बोडस, राम गणेश गडकरी इ. अनेक कलाकार तसेच चित्रतपस्वी आबालाल रहिमान, आनंदराव पेंटर, बाबुराव पेंटर यांनी आपली कला महाराजांकडे राहून जोपासली.

**शाहिरी कला:**

विविध कलावंत मंडळींना महाराजांनी राजाश्रय दिला. इतर कलांप्रमाणे शाहिरी कलेलाही त्यांनी उत्तेजन आणि प्रोत्साहन दिले. सत्यशोधक जलसे, तमासगीर या माध्यमांव्दारे लोककलेचे दर्शन घडविण्यासाठी महाराजांनी विशेष प्रयत्न केले. कोल्हापूर संस्थानात शाहीर विठ्ठल बिराजी डोणे, शाहीर रामचंद्र नरहर माळी, शाहीर लहरी हैदर, जंगली मुजावर, शाहीर ईश्वरा माळी हे कलगीतुरेवाले यांचे फड रंगू लागले. अध्यात्मातील अनेक वाद–संवाद, सवाल–जबाबाच्या लावण्यांमधून रंगले. डफतुणतुण्याच्या आणि कडेढोलकीच्या नादांतून वीरांच्या यशोगाथा शाहिरांच्या वाणीतून गर्जू लागल्या. या सर्वच शाहिरांनी राजर्षीचे गुणगान गावे हे साहजिक होते.

कवी लहरी हैदर यांच्या पोवाड्याची सुरुवात अशी होते–

जो निद्रिस्त महाराष्ट्राला, जागे करण्याला ज्ञानरवी झाला ।
शाहू छत्रपती सत्य आधार, मानवी जाणविले अधिकार।
म्हणून शाहू प्रभू देव अवतार ।।

राजकवी आबा ईश्वरा माळी लिहितात,

महासत्व शूर शाहू छत्रपती राजर्षी मूर्ती ।
अवतार भूवरती। कलि युगासी ।।
चौमुलखी नावाचा डंका। लोभाचा पंखा ।
राव आणि रंका। प्रिय सकलासी ।।

शाहीर रामचंद्र शंकर दळवी हे राजर्षीचे समकालीन असून शाहूंचे गुण आणि कर्तव्याची महती गाताना ते म्हणतात–

शांतीचा केवळ सिंधू। दीनांचा बंधू। दयेचा साठा।।
विद्येची अभिरुची भारी। न्यायनीती चोख दरबारी।
शाहूपुरी पेठ व्यापारी। आगगाडी आणली द्वारी।
बहुगुणांत गुणवान स्वारी। श्रीकृष्ण जसे व्दापरी।।

रयतेचा वाली असणारा हा लोकराजा अंतर्धान पावल्यावर शाहीर दीनपणे आक्रोश करतो–

दीनांचा पालनवाला। तो शाहू नृपती गेला।।
बुद्धासम उदार नेता।
जनकासम सुतत्ववेता।
शिवछत्रपतीसम कुशल राज्यकार्याला। तो शाहू नृपती गेला।।
धाडसात नेपोलियन।
शक्ती भीम की जान।
गुणिजनांस भोजासम जो राजा झाला। तो शाहू नृपती गेला।।

शाहीर आबा माळी यांच्या पोवाड्यातील वियोग दु:खाची आर्तता अंत:करणाला स्पर्श केल्यावाचून राहत नाही.

अकस्मात बुडविले जहाज। शाहू महाराज। गेले हंसराज कैलासासी।।
कैसा वियोग पडला डोंगर। फुटला नीर सागर। दु:ख भयंकर राजमंदिरासी।।
कोठे पहावी शाहू माई। दीनांची आई। गेले वनवासी। सोडून वत्सासी।।
गुण प्रभूचे आठवावे किती। नाही त्या मिती। आणखी राजनीती। चतुर गुणरासी।।
मूर्ती सकल गुणसंपन्न। पूर्ण दयाघन। स्मरती जन। हर वक्तासी।।

या सर्वच शाहिरांवर शाहूंच्या कुशल नेतृत्वाचा, बहुजन समाजोद्धारक, अस्पृश्योद्धारक, उदार धोरणाचा, सामाजिक समतेचा, शिक्षणविषयक दूरदृष्टीचा, ठायी असलेल्या अचाट सामर्थ्यशक्तीचा, गुणग्राहकतेचा प्रभाव पडल्याखेरीज राहिलेला नाही.

शिक्षणामुळेच बहुजन समाज विकसित होईल यावर महाराजांचा दृढ विश्वास होता. शाहूंच्या काळात वृत्तपत्रांनीही शैक्षणिक जागृतीचे कार्य केले. पण साक्षरतेचा प्रसार हळूहळू होत असल्यामुळे वाचणाऱ्याचे प्रमाण अत्यल्प होते. म्हणून महाराजांनी शिक्षण प्रसारासोबतच सत्यशोधक जलशाची युक्ती योजली. जलशातल्या डफतुणतुण्याचा आणि कडेढोलकीचा आवाज घुमू लागला की खेडूत शेतकरी, सर्वसामान्य जनता धावत सुटे. या जलसेवाल्यांनी धार्मिक रुढींचा फोलपणा, भिक्शुकांचा धर्मविषयक दांभिकपणा, लग्नकार्यातील अनाठायी होणारा खर्च, शिक्षणाचे महत्व, वेठबिगारी, हिंदू विधवांचे केशवपन इ. अनेक विषयांवरील प्रहसने सादर केल्यामुळे मनोरंजनाबरोबर प्रबोधन हा मुख्य हेतू आपोआपच साध्य होत असे. या जलशांच्या प्रचारामुळे क्रांतिकारक सुधारणा होऊ लागल्या. कविजनांवरही राजर्षीची कृपादृष्टी होती. आप्पाजी धुंडिराज मुरतुले उर्फ कवी सुमंत यांच्यासारखा प्रतिभासंपन्न कवी महाराजांच्या छत्रछायेखाली कीर्ती पावला. सुमान्तांच्या स्फुटकाव्यात 'मौक्तिकमाला', 'गीतावली', 'भावनिनाद' इ. काव्यसंग्रहांचा समावेश होतो. काव्यक्षेत्रात मौलिक कामगिरी बजावणाऱ्या या कवीने छत्रपतींच्या खाजगी खात्यात नोकरी केली. पण नोकरीपेक्षाही महाराजांनी त्यांच्या काव्यकलेची खऱ्या अर्थाने जोपासना केली, वाढवली. १९३२ साली कोल्हापूर येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनांतर्गत कविसंमेलनाचे कविवर्य सुमंत स्वागताध्यक्ष होते.

शाहीर, तमासगीर, कवी, सत्यशोधक जलसेवाले, गायक, नर्तक, वादक, रंगभूमीचे कलाकार, चित्रतपस्वी इ. ना या कलाप्रेमी राजाचे लाभलेले सहाय्य अभूतपूर्व होते. एका उच्चतम ध्येयाने प्रेरित झालेल्या राजर्षींनी ललित कलांचा विकास साधला, शैक्षणिकदृष्ट्या बहुजन समाज प्रगतिपथावर आणला आणि आपले समतेचे स्वप्न साकार केले. शाहू महाराजांच्या उदार अंत:करणात गुणग्राहकता व गुणगौरव असा गंगायमुनेच्या पवित्र व आदर्श संगमाचा स्त्रोत चिरंतन वास करीत होता. पु. लं. नी महाराजांचा उल्लेख 'एक धिप्पाड माणूस' असा केलेला आहे. तो सार्थच आहे. धैर्य आणि धाडस याचं ते मूर्तिमंत उदाहरण होते. सभोवताली टीकेचा भडिमार सुरु असताना त्यांनी समाजातील रूढीबंधने झुगारत क्रांतिकारी निर्णय घेतले, आमूलाग्र सुधारणा केल्या आणि आदर्श प्रस्थापित केले. राजबंधने असूनही, शाही रीतीरिवाज बाजूला ठेवून राजर्षी शाहू महाराज लोकोत्तर युगपुरुष ठरले.

कविवर्य सूर्यकांत खांडेकर यांच्या शब्दात–

हिरे, माणके, सोने उधळा जयजयकार करा।
जय राजर्षी शाहू राजा तुजला हा मुजरा।।
आदर्शच तू लोकनायका धर्मसंस्कृतीचा
अग्रदूत तू समाजपुरुषा, समता क्रांतीचा
दीनासाठी दीन होऊनी पुसतो हा आसू
जगन्मित्र हा चराचरावर पिकवितसे हासू।।
शाहिरांचा, रणमल्लांचा जिवलग तू मानी
परकीयांना नमले नाही मस्तक अभिमानी
दिव्य साहसी, रमे धाडसी, मर्दाची छाती
कळीकाळासी करी सामना वैऱ्याच्या राती
प्रजापालनी प्रेम वर्षले, भोळ्या पित्याचे
ब्रीद राहिले फडकत याचे, भगव्या बाण्याचे।।

**निष्कर्ष:**

१. संगीताची आवड हा वारसा शाहू महाराजांना त्यांचे जनक पिता आबासाहेब घाटगे यांच्याकडून मिळाला.
२. राजर्षी शाहू महाराजांनी करवीर राज्यात संगीत कलेबरोबर नाट्यकलेलाही राजाश्रय मिळवून दिला.
३. शाहू महाराजांनी करवीरमध्ये कला, नाट्य यांचा विकास व्हावा म्हणून विशेष प्रयत्न केले.
४. राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रेरणेमुळे 'देवल क्लब' या संस्थेस अखिल भारतीय कीर्ती प्राप्त झाली.
५. शाहू महाराजांनी शास्त्रीय संगीत, नाट्य, चित्रकला, लोकसंगीत इ. कलांना राजाश्रय देऊन त्यांचे महाराष्ट्रात सुवर्णयुग निर्माण केले.

**समारोप:**

राजर्षी शाहू महाराजांच्या अंत:करणात रसिकत्वाचा झरा अखंडपणे झुळझुळत होता. विविध कलांची वाढ व्हावी, कलाकारांची प्रगती व्हावी यासाठी हजारो रुपये खर्च करणारा दानशूर, गुणिजनांचे कौतुक करणारा गुणग्राहक राजा म्हणजे शाहू महाराज होय. आपल्या दरबारामध्ये विविध कलाकारांना राजाश्रय देऊन कलेची सर्वांगीण वाढ होण्यासाठी त्यांनी त्या–त्या कलेचे प्रशिक्षण दिले. नैसर्गिक आपत्तींमध्ये महाराजांनी कलाकारांचा सांभाळ केला, त्यांचे नाव भारतभर कसे गाजेल यासाठी विशेष प्रयत्न केले.

**संदर्भ:**

१. कीर धनंजय, राजर्षी शाहू छत्रपती, पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि. मुंबई, दुसरी आवृत्ती, १९९२.
२. गर्गे स. मा., करवीर रियासत, दुसरी आवृत्ती, पुणे, १९८०.
३. जाधव रमेश, लोकराजा शाहू छत्रपती, प्रथम आवृत्ती, पुणे,१९९७.
४. जाधव रमेश, लोकराजा शाहू छत्रपती गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक सचिवालय विभाग, मुंबई, २०१६.
५. देवळे शं. रा., राजर्षी शाहू महाराज, कौस्तुभ प्रकाशन, नागपूर, १९८९.
६. पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू: एक दृष्टीक्षेप, कोल्हापूर, १९८९.
७. पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू छत्रपती: जीवन व कार्य, महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी, कोल्हापूर.
८. पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, प्रथम आवृत्ती, कोल्हापूर, २००१.
९. पवार जे. के., राजर्षी शाहू : विचार व कार्य, राज प्रकाशन, कोल्हापूर, २०१७.
१०. पवार वसुधा ज., राजर्षी शाहू छत्रपती, सुमेक प्रकाशन, डोंबिवली (पू), २००४.
११. पाटील भिकशेठ ज्ञानदेव, लोकराजा शाहू छत्रपती, शिव–शाहू मंच, कोल्हापूर, २००५.
१२. भोसले एस. एस., राजर्षी शाहू संदर्भ आणि भूमिका, रणजीत प्रकाशन, प्रथम आवृत्ती, कोल्हापूर, १९८१.
१३. मोरे गिरीश, राजर्षी शाहू: विचार व कार्य, निर्मिती विचारमंच, प्रथम आवृत्ती, कोल्हापूर, २००९.
१४. वनिरे ए. जी. बहुजनपर्व, श्री. प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाउस, कोल्हापूर, २०१४.
१५. सरनाईक पि. रा., करवीर दरबार शाहीर पिराजीराव सरनाईक यांचे पोवाडे, कोल्हापूर, १९८३.